# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग कार्यालय

## कार्यपत्रिका क्र. १२

## सभावृत्तांत

दिनांक : ०८/०१/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१४ ची मासिक सभा बुधवार दिनांक ०८/०१/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित करण्यात आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. जावेद रमजान शेख - अध्यक्ष
२) मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४) मा.सौ.भालेकर अरुणा दिलीप
५) मा.सौ.स्वाती प्रमोद साने
६) मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७) मा.सायकर अजय शंकरराव
८) मा. सौ.जाधव साधना रामदास
९) मा.जाधव राहूल गुलाब
१०) मा.सौ.बाबर शारदा प्रकाश
११) मा. उल्हास शेट्टी
१२) मा.सौ.उबाळे सुलभा रामभाऊ
१३) मा.सौ.बोऱ्हाडे शुभांगी संजय
१४) मा. मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
१५) मा.सौ.(चिखले) मराठे आश्विनी अजित
१६) मा. सौ. भारती फरांदे
१७) मा.आर.एस.कुमार
१८) मा.सौ.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
१९) मा. राजू मिसाळ
२०) मा. सौ.नंदा विकास ताकवणे
२१) मा. सौ.काळभोर वैशाली जालिंदर

याशिवाय मा.श्री.ज्ञानेश्वर ढेरे, प्रभाग अधिकारी, मा.श्री.संजय भोसले, कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.लियाकत पिरजादे, कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.मिलींद कपिले, कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.श्रीम. रेखा गाडेकर, प्रशासन अधिकारी, मा.श्री.पी.जी.जाधव, लेखाधिकारी, मा.श्री.एकनाथ ढवळे, उपअभियंता(जल नि:सारण), मा.श्री.शिवाजी चौरे, उपअभियंता(नगररचना), मा.श्री. अनिल शिंदे, उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.मोहन करमरकर, उपअभियंता(पाणीपुरवठा), मा.श्री. एस.के.शितोळे, कनिष्ठअभियंता (झो.नि.पु.), श्री.बगाडे, सहा.उद्यान अधिक्षक हे उपस्थित होते.

मा.अध्यक्ष यांनी उपस्थित सन्माननिय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा.अध्यक्ष यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

| | |
|---|---|
| विषय क्र. २ | मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र<br>निगडी स्मशानभूमी येथील विद्युत दाहिनी चालन व देखभाल दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत. |
| विषय क्र. ३ | मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव<br>भूसंपासद प्रकिया सुरू करणे व आरक्षण वगळणेबाबत |
| विषय क्र. ४ | मा.शारदा बाबर यांचा प्रस्ताव<br>विद्यानगर प्रभाग क्र.८ येथील बेकायदेशिर बांधकाम व सार्वजनिक गटारांवर बांधलेली बांधकामे तोडणेबाबत. |
| विषय क्र. ५ | मा.शारदा बाबर यांचा प्रस्ताव<br>विद्यानगर येथील अनाधिकृत तेल व्यवसायाची बांधकामे काढणेबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २१८ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : ०८/०१/२०१४ | विभाग | : विद्युत |
| सुचक | : मा. राजू मिसाळ | अनुमोदक | : मा. आर.एस.कुमार |

संदर्भ: मा.प्रभाग अधिकारी यांचकडील पत्र क्र.अप्र/वि/कावि/जा/ ९५१/२०१३
दिनांक : ३१/१२/२०१३

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २८४० दिनांक ०५/०२/२०१३ चे मान्यतेनुसार मे.श्रीयश सेल्स आणि सर्व्हिसेस कॉर्पो. रावेत, पुणे यांचेबरोबर अ प्रभाग कार्यालयाचे विद्युत विभागाकडे दोन हैड्रोलिक शिड्या/ वाहने भाडेतत्वावर पुरविणेबाबत ५ वर्षासाठी करारनामा करणेत आलेला आहे. त्यानुसार अ प्रभाग विद्युत विभागाकडे दोन हैड्रोलिक शिड्या/ वाहने भाडेतत्वावर पुरविणेत आलेले आहेत. सदर वाहनांचे भाडे देणेकामी सन २०१३-१४ महसुली बजेटमध्ये र.रु.२०,००,०००/- (वीस लाख) तरतुद करणेत आलेली होती. परंतु सदर रकमेतून दिनांक ०८/१०/२०१३ अखेर र.रु.१८,८७,१००/- खर्च झालेला असून र.रु.१,१२,९००/- इतकी शिल्लक आहे. सदरचे लेखाशिर्षावर सन २०१३-१४ अखेर हैड्रोलिक शिड्या/ वाहने भाडेतत्वावर पुरविणेकरिता आणखी र.रु.१८,००,०००/- (आठरा लाख) वाढीव तरतूद अपेक्षित आहे. याकरिता "ध्वनीक्षेपण व्यवस्था" या लेखाशिर्षामधून र.रु.१०,००,०००/- (दहा लाख) व "अ प्रभागांतर्गत मोकळया जागेवर तात्पुरते पुनर्वसन शेडसाठी वीजबील खर्च" या लेखाशिर्षामधून र.रु. ८,००,०००/- (आठ लाख) अशी एकुण र.रु. १८,००,०००/- (आठरा लाख) तरतूद "अ प्रभाग विद्युत विभागाकडे दोन हैड्रोलिक शिड्या/ वाहने भाडेतत्वावर पुरविणे" या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे. सदरचा ठरावा कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही

करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २१९ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : ०८/०१/२०१४ | विभाग | : विद्युत |
| सुचक | : मा. शुभांगी बो-हाडे | अनुमोदक | : मा. अश्विनी चिखले (मराठे) |

संदर्भ: मा.प्रभाग अधिकारी यांचकडील पत्र क्र.अप्र/वि/कावि/१४ /२०१४
दिनांक : ०७/०१/२०१४

निगडी स्मशानभूमी येथील विद्युत दाहिनी चालन देखभाल दुरुस्तीचे कामची मुदत मार्च-२०१४ ला संपत असलेने सदर कामाचे सन २०१४-१५ करीता नव्याने निविदा काढणेस आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामासाठी येणाऱ्या र.रु. ९,९९,९००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख नव्याण्णव हजार नऊशे फक्त) खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २२० | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : ०८/०१/२०१४ | विभाग | : नगररचना/ स्थापत्य |
| सुचक | : मा. उल्हास शेट्टी | अनुमोदक | : मा. दत्तात्रय साने |

संदर्भ: मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सन १९९५ च्या विकास आराखड्यानुसार आकुर्डी येथील स.क्र.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. सदर आरक्षण पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियंत्रणामध्ये सन १९९७ पासून आलेले आहे. सदर आरक्षणामध्ये काही १९९५ व १९९७ पुर्वीची जुनी बांधकामे होती व नंतरच्या काळात देखील काही बांधकामे झालेली आहेत. या आरक्षणामध्ये १८ गुंठे जागा रिकामी असून इतर जागेत अनाधिकृत बांधकामे आहेत. १८ गुंठे रिकाम्या जागेचे भूसंपादन प्रक्रिया सुरु करणेस व ज्या जागेमध्ये बांधकामे झाली आहेत ती जागा आरक्षणामधून वगळणेस मान्यता घेणेकामी सदरचा विषय सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे पाठविणेस शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २२१ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : ०८/०१/२०१४ | विभाग | : स्थापत्य / झो.नि.पु. |
| सुचक | : मा. शारदा बाबर | अनुमोदक | : मा. अरुणा भालेकर |

संदर्भ: मा. शारदा बाबर यांचा प्रस्ताव

विद्यानगर प्रभाग क्र.८ येथील एकता तरुण मंडळाजवळील व त्याच्या आजूबाजूच्या मोकळ्या जागेवर श्री.दत्ता बाबूराव मोरे ही व्यक्ती शेजारील नागरीकांना दमबाजी करुन बेकायेशीर बांधकाम करुन सदर खोल्या गोर-गरीब नागरीकांना विकून त्यांची फसवणूक करीत आहे. या सर्व जागेचा फोटोपास माझ्याच नावावर आहे असे खोटेच सांगून लोकांची फसवणूक करीत आहे. सदर प्रकरणी समक्ष पहाणी करुन संबंधितावर रीतसर कारवाई करुन सदर प्रकरणी आळा घालावा. या कामी झोपडपट्टी विभागाने आवश्यक ती तपासणी करावी.

तसेच विद्यानगर मधील अनेक नागरीकांनी सार्वजनिक गटारांवर वाढीव बांधकाम केल्यामुळे गटारांची साफसफाई होणेस अडचण येत आहे. अरुंद रस्त्यामुळे अनेक अडचणी येत आहेत. स्थापत्य विभागाने सार्वजनिक गटारांवरील वाढीव बांधकामे निष्कासित करावी, यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २२२ | विषय क्रमांक | : ५ |
| दिनांक | : ०८/०१/२०१४ | विभाग | : स्थापत्य / झो.नि.पु. |
| सुचक | : मा. शारदा बाबर | अनुमोदक | : मा. अरुणा भालेकर |

संदर्भ: मा. शारदा बाबर यांचा प्रस्ताव

विद्यानगर प्रभाग क्र.८ मधील मस्जीदच्या मागील बाजूस गेल्या अनेक वर्षापासून काही मंडळींनी अनाधिकृत बांधकामे करुन त्यामध्ये मोठया प्रमाणावर अनाधिकृत तेल व्यवसाय सुरु केलेला आहे. तेल कंपनीने वापरुन फेकून दिलेले तेल सदर व्यवसायीक त्या ठिकाणी आणून त्या मध्ये ॲसिड व इतर अनेक रासायनिक प्रक्रिया करुन ते तेल परत दोन नंबरने विकतात. सदर तेलावर जेव्हा रासायनिक प्रक्रिया केली जाते त्यावेळी आजूबाजूच्या शेकडो नागरीकांना त्याचा त्रास होत आहे. तसेच त्या ठिकाणी या आगोदर दोन वेळा आग लागली होती. भविष्यकाळात नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून हे सर्व घातक आहे. म्हणून सदर अनाधिकृत व्यवसाय व त्यावर केलेले बांधकाम त्वरीत पाडून टाकणेत यावीत, यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-

(श्री.जावेद शेख)

अध्यक्ष

अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग समिती
अप्र/११/ कावि/ ४० /२०१४
दिनांक २० /०१/२०१४

सही/-

प्रशासन अधिकारी अ प्रभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी ४४

प्रत- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.